# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.08.2025** **वार- गुरुवार**

---

**<u>स्वच्छ भारत</u>**

पुणे जिल्ह्यातल्या प्रमुख नद्या प्रदूषणमुक्त करण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या प्रकल्पांना गती मिळाली असून, या प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केवळ मोठ्या नद्यांवरच नव्हे, तर त्यात मिळणाऱ्या छोट्या नदी-नाल्यांच्या पाण्यावर देखील प्रक्रिया करण्याची गरज आहे. यासाठी लवकरच पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पीएमआरडीए आणि जिल्हा परिषद यांच्या संयुक्त बैठकीचं आयोजन केलं जाणार असल्याची माहिती केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा विकास समन्वय आणि सनियंत्रण समिती आढावा बैठकीत ते आज बोलत होते.

**<u>क्रीडा दिन</u>**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट इंडिया आणि खेलो इंडिया ही क्रीडा चळवळ सुरू केली. त्याला आणखी बळ देण्यासाठी सांसद खेल महोत्सव योजना सुरू करण्यात येणार आहे. याविषयीची घोषणा केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत केली.

या महोत्सवांतर्गत ३३ क्रीडा प्रकारामध्ये जिल्हास्तरीय स्पर्धा नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात सुरु होणार आहेत. यामध्ये विविध वयोगटात २५ हजार खेळाडू सहभागी होतील अशी माहिती मोहोळ यांनी दिली.

दरम्यान, म्हाळुंगे – बालेवाडी च्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात शालेय शिक्षण, क्रीडा विभाग आणि महाराष्ट्र राज्य यांच्या वतीनं क्रीडा दिनानिमित्त पारितोषिक वितरण समारंभाचं आयोजन करण्यात आलं आहे. तसंच मिशन लक्ष्यवेध हाय परफॉर्मन्स सेंटर या उपक्रमाचा शुभारंभ होणार आहे. आता सुरु असलेल्या या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित आहेत.

**<u>बालसाहित्य पुरस्कार</u>**

स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे पुरस्कृत 'इंदिरा अत्रे बालसाहित्य' पुरस्कारांचं वितरण आज ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते पुण्यात झालं.

डॉ. शंतनू अभ्यंकर यांच्या 'शास्त्रज्ञ आजीच्या गोष्टी' या किशोर-कुमारवयीन गटासाठी लिहिलेल्या कादंबरीला, राजीव तांबे यांच्या 'डेंजरस झिरो ग्राउंड प्लेट' या बाल साहित्यास, मिलिंद सबनीस लिखित 'कहानी वंदे मातरम्' ची या पुस्तकाच्या मुखपृष्ठ तसंच पुस्तकातील चित्रांसाठी चंद्रशेखर जोशी यांना आणि विशेष उल्लेखनीय पुस्तक म्हणून वर्षा चौगुले यांच्या 'गंमत शब्दांची' तर संजीवनी बोकील यांच्या 'गोष्टींतून कबीर' या पुस्तकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

बालसाहित्याच्या माध्यमातून मुलांची फक्त करमणूकच नव्हे तर त्यांच्यातील जिज्ञासा जागृत करण्याचं काम केलं जातं. असं डॉ. सदानंद मोरे यावेळी म्हणाले.

**<u>भांडारकर</u>**

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या वतीनं प्राच्यविद्येच्या क्षेत्रातील विद्वत्तेकरिता आणि कार्यासाठी दिला जाणारा "सर रा. गो. भांडारकर स्मृति-पुरस्कार" नामवंत पुरातत्त्वज्ञ आणि डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठातील प्रा. के. पद्दय्या यांना जाहीर झाला आहे. सर भांडारकरांच्या स्मृतिशताब्दीच्या कार्यक्रमामध्ये भांडारकर संस्थेचे मानद सचिव प्रा. सुधीर वैशंपायन यांनी या पुरस्काराची आज घोषणा केली. अश्मयुगातील निरनिराळ्या कालखंडांचा आणि संस्कृतींचा धांडोळा प्रा. पद्दय्या यांनी घेतलेला आहे. भांडारकरांच्या स्मृतिशताब्दीच्या निमित्तानं "युक्लिडच्या भूमितीविषयीचा एकविसाव्या शतकातील दृष्टिकोण" या विषयावर सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क च्या प्राध्यापक रवींद्र कुलकर्णी यांचं व्याख्यान आयोजित करण्यात आलं होतं.

**<u>एफडीएची मोहीम</u>**

पुणे अन्न आणि औषध प्रशासन गणेशोत्सवात विशेष तपासणी मोहीम राबवणार आहे. 'एफडीए' नं जिल्ह्यात ११ ऑगस्टपासून आजपर्यंत ३५ अन्न आस्थापनांच्या तपासण्या केल्या आहेत. त्यामध्ये प्रसादासाठी लागणारे कच्चे अन्नपदार्थ आणि मिठाईचे ६२ नमुने विश्लेषणासाठी घेतले आहेत. याबाबतचा अहवाल प्राप्त होताच कायद्याप्रमाणे कारवाई होईल. गणेशोत्सव आणि आगामी सणासुदीच्या काळात धडक कारवाई सुरूच राहणार असल्याचं पुणे अन्न आणि औषध प्रशासनाचे सह आयुक्त सुरेश अन्नपुरे यांनी पत्रकाद्वारे सांगितलं आहे.

**<u>आरोग्य तज्ज्ञ पथके</u>**

पावसाळा सुरू असल्यानं डेंग्यू, चिकुनगुनियासह कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढला असून राज्यभरात रुग्णसंख्या वाढल्यानं आरोग्य विभागानं तातडीनं पावलं उचलली आहेत. डॉक्टर आणि सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांची जलद प्रतिसाद पथकं तयार करण्यात आली असल्याची माहिती पुणे आरोग्य विभागाचे सहसंचालक डॉ. संदीप सांगळे यांनी दिली.

**<u>प्रारूप प्रभाग रचना</u>**

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठीच्या प्रारूप प्रभाग रचनेवर आतापर्यंत ३४४ हरकती आणि सूचना नोंदवण्यात आल्या आहेत. आगामी निवडणुकीसाठी नगरसेवकांची संख्या १६५ असून ४१ प्रभाग आहेत. त्यापैकी ४० प्रभाग चार सदस्यीय, तर ३८ क्रमांकाचा आंबेगाव-कात्रज प्रभाग पाच सदस्यांचा आहे. महापालिकेमध्ये ३४ गावांचा समावेश करण्यात आला होता; पण उरुळी देवाची आणि फुरसुंगी ही दोन गावं वगळल्यामुळे महापालिकेचे क्षेत्रफळ कमी झाले आहे. प्रभाग रचनेवर हरकती आणि सूचना करण्याची मुदत ४ सप्टेंबरपर्यंत आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश ढगाळ होतं तर काही ठिकाणी पावसाच्या सरी बरसल्या. घाट परीसरात मात्र जोरदार पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

दरम्यान, सततच्या पावसामुळे पवना धारण १०० टक्के भरलं आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**